# मिरा भाईदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २९/०४/२०२२ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|
| **४०. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. ०३/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) महापालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या मंजूर पदानुसारच (आस्थापना सुची प्रमाणेच) वेतन देयक देण्याची तरतुद असताना देखील मंजूर पदांपेक्षा (आस्थापना सुचीपेक्षा) जादा पदांचे वेतन देयक अदा केले जातात हे खरे आहे काय? | | होय. तथापी अत्यावश्यक सेवा पुरविण्यासाठी खालीलप्रमाणे सेवा पुरविल्या जातात.<br>➢ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ उद्याने, पाण्याची टाकी, स्मशानभूमी, मैदाने, महानगरपालिकेच्या शाळा, वाचनालय व अभ्यासिका यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.<br>➢ वाहतूक पोलिसांच्या विनंतीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाहतूक नियंत्रण करणेकामी वाहतूक शाखेच्या मदतीसाठी ट्राफिक वॉर्डन यांचा पुरवठा करण्यात येत आहे.<br>➢ महानगरपालिकेच्या विविध विभागात कामकाजात सुसुत्रता येण्याच्या दृष्टीकोनातून व कामकाज वेळेत पूर्ण होण्याच्या हेतूने संगणक चालक तथा लिपीक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.<br>➢ वैद्यकीय विभागासाठी वैद्यकीय कामकाजाकरीता बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.<br>उपरोक्त पदांची नेमणूक ही इतर महानगरपालिकेप्रमाणे करण्यात आलेली आहे. |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. मंजूर पदे, (आस्थापना सुचीप्रमाणे) विभाग निहाय/पद निहाय माहिती मिळावी. अदा केलेली वेतन देयके त्यामध्ये विभाग निहाय / पद निहाय असलेली माहिती मिळावी. वेतन देयकाची (हयामध्ये कायम कर्मचारी/ठेक्यावर असलेली कर्मचारी/अस्थायी असलेले कर्मचारी सर्व कायम अस्थायी / ठेका वरील तात्पुरत्या / कायम कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.) माहिती मिळावी. | | ➢ मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आकृतीबंध दि.26/02/2019 रोजी मंजूर झालेला आहे. सदर आकृतीबंधामध्ये विभाग निहाय पदे मंजूर आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.<br>➢ वेतन देयकाबाबतच्या माहितीचा तक्ता सोबत जोडलेला आहे. |
| ब) महापालिकेच्या आस्थापना खर्चावर शासनाच्या मानकाप्रमाणे /निर्बंधाप्रमाणे किती टक्के पर्यंत खर्च करणेची मर्यादा आहे? प्रत्यक्षात (2020-21 वर्षात) झालेल्या खर्चाची टक्केवारी किती आहे? | | ➢ महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्चाची मर्यादा 35% पर्यंत आहे.<br>➢ सन 2020-21 या वर्षातील खर्चाबाबतच्या टक्केवारीचा प्रस्ताव लेखा विभागाकडून मा. महासभेपूढे प्रस्तावित करण्यात आलेला आहे. मा.महासभेची मंजूरी मिळताच आपणांस खर्चाच्या टक्केवारीची माहिती देण्यात येईल. |
| क) आस्थापनेवरील खर्च शासनाने घालून दिलेल्या निकषापेक्षा जास्त होत असल्यास, आस्थापनेवरील खर्च यापुढे वाढून देणेबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे व त्यासाठी कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत? | | सन 2021-22 या वर्षात जवळपास 170 सुरक्षारक्षकांची कपात करुन जवळपास रु.36 लाख प्रती महिना इतकी बचत झालेली आहे. तसेच आस्थापनेवरील होणारा खर्चाबाबत आढावा घेऊन योग्य त्या उपायायोजना करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. |

| | | |
|---|---|---|
| **४१. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ३१/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) शहरातील एकूण किती सार्वजनिक शौचालये आहेत ज्यांची देखभाल मनपा करते? | | शहरात एकूण 210 सार्वजनिक शौचालये आहेत. यामध्ये एकूण 3449 सिट्स आहेत. ज्यांची देखभाल मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. |
| अ) सदर कामाचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे? | | सदर कामाच्या निविदा सार्व. बांधकाम विभागामार्फत मागविण्यात येत आहेत. मा. स्थायी समिती सभा दि. 19/09/2020 रोजी ठराव क्र. 35 अन्वये मंजूरी प्राप्त झाली. त्यानुसार मंजूर निविदाकार मे. शाईन मेटेंनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. यांना दि. 03/11/2020 रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन देखभाल निगा व दुरुस्ती कामासाठी वार्षिक रु. 06 कोटी रक्कमेची निविदा मागविण्यात आली होती. |
| ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे? | | सदर ठेक्यामध्ये शहरातील सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन साफसफाई देखभाल व दुरुस्ती निगा या कामांचा अंतर्भाव आहे.<br>सार्व. बांधकाम विभागामार्फत शौचालयाची डागडूजी, चेंबर, फर्शी, लादी, पाईप, नळ, दरवाजे, रंगकाम, लाईट इत्यादी दुरुस्ती कामांवर नियंत्रण ठेवण्यात येते.<br>आरोग्य विभागामार्फत शौचालयाची दैनंदिन साफसफाई देखभाल राखणे कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येते. |
| क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली? | | शहरातील सार्वजनिक शौचालयांच्या दैनंदिन देखभाल व निगा राखणे या कामात ठेकेदाराने कसूर केल्याबाबत करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार माहे नोव्हेंबर, 2020 ते डिसेंबर, 2021 पर्यंत कारवाई करुन रु. 15,31,700/- इतकी रक्कम दंडस्वरुपात मासिक देयकातून कपात करुन मनपा फंडात जमा करण्यात आलेली आहे. |
| **४२. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) शहरात एकूण किती सार्वजनिक उद्याने व बगीचा यांची मनपा देखभाल करते? | | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ७५ उद्याने, १२ मैदाने, ११ स्मशाने व १९ दुभाजके यांची निगा व देखभाल ठेकेदारामार्फत करण्यात येते. |
| अ) सदर देखभाल व दुरुस्ती कामाचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे? | | सदर उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची २ वर्ष कालावधी करीता निगा व देखभाल करणे कामाचा ठेका मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस या कंपनीला जा.क्र. मनपा/ वृ.प्रा./ मिरारोड/ २०/ २०२१-२२ दि.१२/०४/२०२१ अन्वये रु.२६,३२,६३,६७३/- देण्यात आलेला आहे. |
| ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे? | | सदर कामाच्या ठेक्यामध्ये मजुरा मार्फत दैनंदिन साफसफाई करणे, पाणी देणे, शोभिवंत झाडांची छाटणी / आकार देणे, लालमाती, शेणखत टाकणे, शोभिवंत झाडे खराब झाल्यास नव्याने लागवड करणे. इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. |
| क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली? | | निरंक |

**४३. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.**

१) शहरामध्ये किती गॅरेजेस आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पक्या इमारतीतील - ०५, | पक्या इमारतीतील - २५, | पक्या इमारतीतील - ३५, | पक्या इमारतीतील - ४५, | पक्या इमारतीतील - १९, | पक्या इमारतीतील - ३२, | १६१ |
| मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ३३ | मोकळ्या जागेतील- ०२ | मोकळ्या जागेतील- ५६ | ९१ |

अ) शहरामध्ये किती कार वॉशिंग सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पक्या इमारतीतील - ०२, | पक्या इमारतीतील - ०३, | पक्या इमारतीतील - ०३, | पक्या इमारतीतील - ०३, | पक्या इमारतीतील - ०१, | पक्या इमारतीतील - ०२, | १४ |
| मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- १३ | मोकळ्या जागेतील- ०१ | मोकळ्या जागेतील- ०४ | १८ |

ब) शहरामध्ये किती सर्विस सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पक्या इमारतीतील - ०२, | पक्या इमारतीतील - ०१, | पक्या इमारतीतील - १७, | पक्या इमारतीतील - ०५, | पक्या इमारतीतील - ००, | पक्या इमारतीतील - ०२, | २७ |
| मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | ०० |

क) शहरामध्ये किती वाहन शोरुम आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पक्या इमारतीतील -०२ | पक्या इमारतीतील -०१ | पक्या इमारतीतील -०६ | पक्या इमारतीतील -१० | पक्या इमारतीतील -०१ | पक्या इमारतीतील -०२ | २२ |
| मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | ०० |

ड) वरील पैकी किती जनांनी मनपाचा परवाना घेतलेला आहे?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | २५ | १६ | ५२ | १५ | ३७ | १५६ |

इ) वरील व्यवसायासाठी प्रती परवाना 10,000.00 प्रमाणे किती परवाना फी मनपाकडे जमा झालेली आहे?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| रु.१,७०,०००/- | रु.२,५०,०००/- | रु.१,६०,०००/- | रु.५,८०,०००/- | रु.१,५०,०००/- | रु.१,६०,०००/- | रु.१४,७०,०००/- |

ई) किती व्यवसाय मनपा आरक्षण जागेत आहेत?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | ०७ गॅरेज | निरंक | निरंक | ०७ गॅरेज |

उ) किती व कोणत्या प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणत्या तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दि.

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

ऊ) 15 दिवसात परवानगी न घेतलल्या कोणत्या आस्थापनांवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

ए) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी मनपाने रस्ते, पदपथ व इतर मोकळ्या

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

| | | |
|---|---|---|
| जागेत वाहने उभी करुन मनपाला किती दंडाची रक्कम जमा केली? | | |
| ऐ) प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी केलेला सविस्तर अहवाल काय आहे? | | वरील नमूद आस्थापनांकडे परवाना घेतलेला नसेल अशा आस्थापनांचे वाहन दुरुस्ती व इतर साहित्य जप्त करण्याची कारवाई वेळोवेळी करण्यात येत असते. तसेच अनधिकृत आस्थापनावर निष्कासनाची कारवाई प्रशासना मार्फत करण्यात येते. |

**(विजयकुमार म्हसाळ)**
**अति. आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**